‘नांदेड जिल्ह्यातील विधिसंघर्षग्रस्त मुलांचा मानवी हक्कांचा अभ्यास’

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड मानव विज्ञान विद्याशाखे अंतर्गत “मानव अधिकार” विषयातील पी. एच. डी. पदवीसाठी सादर करावयाचा संशोधनपूर्व आराखडा

संशोधक

गौतम केरबा कदम

मार्गदर्शक

डॉ. सुरेखा वि. दाडगे

कै. बापूसाहेब पाटील एकंबेकर महाविद्यालय, उदगीर

संशोधन केंद्र

महात्मा बसवेश्वर महाविद्यालय,

लातूर.

डिसेंबर-२०२२

नांदेड जिल्ह्यातील विधिसंघर्षग्रस्त मुलांचा मानवी हक्कांचा अभ्यास

प्रस्तावना :

विसाव्या शतकात विधीसंघर्षग्रस्त (बालगुन्हेगारी) समस्या जागतिक समस्या म्हणून ओळखली जाते. अल्पवयीन, अपरिपक्वता मुलांनी केलेल्या गुन्ह्यासंबंधी आधुनिक संकल्पना विसाव्या शतकात रुढ झाली. तोपर्यंत मुलांना त्यांचे वय न पाहता गुन्ह्याचे स्वरुप पाहुन शिक्षा दिली जाई. आधुनिक काळात मात्र अशा गुन्हेगार मुलांना सुधारण्याचेच प्रयत्न केले जातात.

बाल वयात मुलांकडून कळत नकळत कांही चुका जे की, उनाडपणा, उचलेगिरी, ब्रात्यपणा, बेशिस्त आणि उन्मार्गीपणा यांमध्ये वारंवारता आली की त्यांचे रुपांतर बेकायदेशिर वर्तनात होते. नागरी हक्क धार्मिक बंधने व रुढी, लोकाचार, शिस्तीबाबतचे नियम इत्यादी विरुध्द वर्तन म्हणजे गुन्हेगारी जे करु नये असे सांगितले जाते, तेच करुन पाहण्याकडे लहान मुलांचा कल असतो; कारण ते का करु नये हे समजण्याइतकी बौध्दीक परिपक्तवता त्यांच्या ठिकाणी आलेली नसते.

सात वर्षा खालील बालकांमध्ये शारिरीक व मानसीक परिपक्तवता नसल्यामुळे केलेले कृत्य ते समजू शकत नाहीत. एखादे कृत्य त्याच्या हातून घडत गेले तरी ते त्याने जाणिवपुर्वक केलेले नसते. म्हणूनच विधीसंघर्षाच्या वयाची किमान मर्यादा सर्व देशांत सात ते आठ वर्षे आहे. कमाल मर्यादा १८ ते वय आहे. भारतात १९६० च्या मुलांच्या कायद्याप्रमाणे हे कमाल वय मुलांसाठी १६ व मुलींसाठी, १८ हे आहे. १९७६ च्या सुधारित कायद्यामध्ये हे वय मुलींसाठी २० वर्षापर्यंत वाढविले आहे.

मुलांच्या बेकायदेशिर आणि समाजविरोधती कृत्यांना सर्वसाधारणपणे विधिसंघर्षग्रस्त म्हंटले जाते.

विधिसंघर्षग्रस्त हे आजारी समाजाचे लक्षण आहे. शहरातील वाढती गर्दी बकालवस्था, जुगार तस्करी मद्यपानाने बाल गुन्हेगारी वाढत आहे. औद्योगिकरण, नागरीकरणाचे विधिसंघर्षग्रस्त बाढत आहे. भारतात सुध्दा पाश्चात देशाप्रमाणे विधिसंघर्षग्रस्त गंभीर स्वरुप धारण करीत आहे. गुन्हे आणि विधिसंघर्षग्रस्त ह्या प्राचीन समस्या आहेत. विशेषता गुन्हेगारीत विधिसंघर्षग्रस्त भर पडत आहे. विधिसंघर्षग्रस्त ही सार्वत्रिक समस्या आहे.

विधिसंघर्षग्रस्त म्हणजे काय ? :

१. डॉ. सुधा काळदाते –

बालगुन्हेगार असे वर्तन आहे जे सामाजिक दृष्ट्या अपेक्षित नसते. (बाल गुन्हेगारी हा शब्द आता कायद्याने वापरता येत नाही पण जेंव्हा ही व्याख्या तवार झाली तेंव्हा वापरता येत होता.)

२. विल्यम शेल्डन –

योग्य अपेक्षांचा भंग करणारे वर्तन म्हणजे बालगुन्हेगारी होय.

३. मार्शल क्लिनार्ड-

विशिष्ट वयोगटातील व्यक्तीने केलेले समाज विघातक कृत्य.

४. फ्रिडलैंडर –

कायद्यांच्या आधारे कारवाई करण्यास पात्र असे दुर्वतन करणारे बालअपराधी होत.

५. सिरील वर्ट –

जेंव्हा बालकाची समाजविरोधी प्रवृत्ती इतकी गंभीर स्वरुप धारण करते की ज्यामुळे बालक कायदेशीर कारवाईचे लक्ष ठरते.

भावनांवर नियंत्रण नसणे, भीती असुरक्षितता, अपराधाची भावना इत्यादीमुळे कारणांमुळे बालकाच्या मनावर परिणाम होतो. विकृतीची वाढ यामुळे मुले गुन्हेगार बनु शकतात. लहानपणी जडलेले मानसिक रोग, मंदबुध्दी, अपंगत्व यामुळे मुलांच्या स्वभावात विकृती येते. घर भोवतालचे वातावरण, शाळा ह्या ठिकाणी घडणा-या चांगल्या वाईट सर्वच घटनांचा प्रभाव मुलांवर पडत असतो. आई-वडिलांच्या प्रेमाचा अभाव त्याचे आपआपसातील बिघडलेले संबंध, कडक शिस्त किंवा जास्त मोकळे वातावरण, फाजिल लाड, दारिद्य अशा यासारख्या गोष्टीचा मुलांच्या मनावर विकृत परिणाम होतो. देशातील आर्थिक व राजकीय परिस्थितीही ह्या गुन्हेगारीस कारणीभूत असतात, आर्थिक विषमता, कष्ट न करता पैसे मिळविण्याचे प्रकार, भ्रष्टाचार, जुगार, मटका इत्यादीमध्ये लहान मुलांना सहभागी करुन घेण्याचे प्रयत्न चित्रपट, नाटक यांमधील कामवासना व हिंसक वृत्तीच्या भडक चित्रणाचा प्रभाव गुप्त पोलिस कथा वा हेरकथा यांमधून मिळणारे गुन्ह्याबाबतचे मार्गदर्शक ह्या सगळ्या संमिश्र कारणांनी मुले मुली गुन्हेगार होण्याची शक्यता असते. झोपडपट्या, गलिच्छ वस्त्या, चोर बाजार, चित्रपटगृहे येथे निर्माण आलेली उपसंस्कृती आत्मसात करण्याच्या प्रयत्नात मुले गुन्हेगार होतात. विधिसंघर्षग्रस्त मुलं भारतात मोठ्या शहरांमध्ये वाढत्या प्रमाणात आळढतात. मद्रास, दिल्ली, कलकत्ता, लखनौ, बैंगलोर इ. शहरांत तसेच महाराष्ट्रात मुंबई, पुणे, सोलापूर, नागपूर, मनमाड इ. ठिकाणी रेल्वे जंक्शनांची गावे औद्योगिक वस्त्या व्यापाराची उलाढाल चालणारी नगरे इ. ठिकाणी गुन्हेगारीचे प्रमाण जास्त आढळते. ग्रामीण भागात जे तालुके राजकीय उलाढाली

वा पिढीजात गटबाजी यामध्ये अधिक रस घेतात. अशा तालुक्यामध्ये अदिवासी व डोंगराळ भागात विशिष्ट प्रकारच्या गुन्हेगारीचे प्रमाण इतर ठिकाणापेक्षा जास्त असते.

जागतीक पातळीवर आता भारताचा सुध्दा विधीसंषघग्रस्त (बालगुन्हेगार) बालकांच्या प्रमाणात वाढ होत आहे. एकोणिसाव्या शतकामध्ये जगातील प्रगत देशांमध्ये या गुन्हेगारांबद्दल स्वतंत्रपणे विचार होऊ लागला व त्या दृष्टीने कायदा तुरुंग व्यवस्था, न्याय व्यवस्था, न्यायालये या सर्वच गोष्टीत बदल केला गेला आणि गुन्हेगारांना शिक्षा न देता त्यांना कोणत्या प्रकारचे शिक्षण दिले असता ती सुधारतील याचाच विचार प्राधान्याने केला गेला. अशा मुलांसाठी खास न्यायालये, अभिक्षण गृहे (रिमांड होम्स), मान्यताप्राप्त केंद्रे (सर्टिफाईड स्कूलस्), मान्यता प्राप्त संमत संस्था फिट परसन्स इन्स्टिट्युशन्स, स्थापन करण्यात आल्या. इंग्लंडमध्ये १८१६ साली तुरूंग सुधारणीसाठी एक समिती नेमण्यात आली १८४७ साली विधिसंघर्षग्रस्त मुलांन संबंधी कायदा झाला. १८६२ मध्ये स्विझर्लॅण्डमध्ये कायदा झाला.

जगातील पहिले बालन्यायालय अमेरिकेत १८९९ मध्ये स्थापन केले गेले. इंग्लंडमध्ये १९०५ मध्ये असे न्यायालय सुरु झाले. १९५० मध्ये भारतात मुंबई, मद्रास, प.बंगाल या राज्यांत व दिल्ली येथे अशी न्यायालये कार्य करीत होती.

बेकायदेशिर वर्तन करणा-या अशा मुलांना पोलीस न्यायालयापुढे उभे करतात. जगातील बहुतेक सर्व राष्ट्रांमध्ये हे काम सामान्य पोलीस करतात. परंतु अमेरिका, ऑस्ट्रेलिया, बेल्जियम इ. ठिकाणी तसेच भारतात महाराष्ट्र राज्यात स्वतंत्र पोलिस यंत्रणादेखील हे कार्य करते. महाराष्ट्रात विधिसंघर्षग्रस्त मुलींच्या चौकशीचे काम शक्यतो स्त्री पोलिसच करतात.

१८ ते २१ वयोगटातील सराईत गुन्हेगारांना बोस्टेल स्कुलमध्ये ठेवतात. इंग्लंडमध्ये १८ ते २३ वयातील गुन्हेगारांना शिक्षा व शिक्षण देण्याच्या पध्दतीला बोस्टेल पध्दत म्हणतात. बोस्टेल हे एका खेडेगावाचे नाव असुन तेथे अशा उद्देशाने पहिली संस्था निर्माण झाली.

एकोणिसाव्या शतकामध्ये इतर देशांप्रमाणे भारतामध्येही एकोणिसाव्या शतकात इंग्लंडच्या प्रभावाने विधिसंघर्षग्रस्त संबंधी विचार होऊन कायदे झाले. अशा त-हेचा पहिला कायदा १८५० साली झाला, त्याप्रमाणे १० ते १८ वर्षापर्यंतच्या गुन्हेगारांना जामिनावर सोडण्याची व्यवस्था झाली. या पाठोपाठ बगालमध्ये १९२२ साली, मुंबईत १९२४ साली कायदे झाले, १९२४ च्या कायद्यात सुधारणा होऊन १९४८ चा कायदा झाला. या कायद्यान्वये मुलाला निष्ठरपणे वागविणा-या अथवा भीक मागण्यास लावणा-या माणसास शिक्षा आहे. मुंबईत बोर्स्टल स्कूल कायदा १९२९. मुंबई अपराधी परिवीक्षा कायदा (प्रोबेशन ऑफ ऑफेंडर्स ॲक्ट) १९३८ हे कायदे झाले. १९६० चा केंद्राचा कायदा व्यापक स्वरुपांचा आहे. त्याची अमलबजावणी काही राज्ये व केंद्रशाशित प्रदेश यांत होते. या कायद्यामध्ये गुन्हेगाराची काळजी घेणे, त्यास संरक्षण देणे, शिक्षण देणे व शिक्षा न देता सुधारणे

ह्या गोष्टींना महत्त्व दिले आहे. महाराष्ट्रात १९७६ मध्ये संमत झालेल्या कायद्यामध्ये मुलांच्या नंतरच्या जपणुकीचा (आफ्टर केअर) विचार केलेला आहे.

भारतात बहुतेक सर्व राज्यांत विधिसंघर्षग्रस्त मुलांन बाबतचा कायदा असुन काही राज्यांत तो काही जिल्ह्यांना लागू आहे तर कांही राज्यात तो जिल्ह्यांना लागू आहे. १९८१ च्या आकडेवारीनुसार या कायद्याच्या अंमलबजावणीसाठी महाराष्ट्रात एकूण ३७ बालन्यायालये होती, रिमांड होम मान्यताप्राप्त केंद्रे यासारख्या अनेक सरकारी व निमसरकारी संस्थाही कार्य करीत असुन सरकारी रिमांड होमची संख्या ४ होती व निमसरकारी रिमांड रुमची संख्या ३४ होती. ह्या दोन्ही प्रकारच्या एकुण २.७६० मुले आहेत. मान्यताप्राप्त संमत संस्था ह्या निमसरकारी स्वरुपांच्या असुन त्या ९९ संस्थांमध्ये एकूण ८,८४७ मुले आहेत. महाराष्ट्रात बोर्टल स्कुल फक्त एकच असुन त्यामध्ये २५० मुले आहेत. सर्वाधिक अल्पवयीन गुन्हेगार १५ ते १७ वयोगटातील तरुणांची संख्या आहे. ६८ टक्के एवढे प्रमाण आहे.

पिंपरी चिंचवडमध्ये बाल गुन्हेगारीत प्रचंड वाढ झालेली दिसते. ११० गंभीर गुन्ह्यात तब्बल १३५ अल्पवयीन मुलं, धक्कादायक बाब म्हणजे पूर्वी केवळ मुंबई, पुण्यासारख्या मोठ्या शहरांत असणारे हे पेच आता या प्रमुख शहरांसोबतच हळुहळु आजूबाजूच्या शहरांमध्ये पसरु लागले आहे. यातील गंभीर बाब म्हणजे मुंबईत गेल्या दोन वर्षात विधिसंघर्षग्रस्त मुलांचे प्रमाण १३% बाढले आहे. नॅशनल क्राईम रेकॉर्डस् ब्यूरो च्या अहवालातून पुढे आले आहे. २००९ च्या आकडेवारीनुसार महाराष्ट्रात ६४६३ विधिसंघर्षग्रस्त मुलांचे गुन्हे नोंदवले, त्यापाठोपाठ मध्यप्रदेशमध्ये ५१७४ तर छत्तीसगडमध्ये २८६० गुन्हे नोंदविण्यात आले. विशेष म्हणजे महाराष्ट्रात बाहेरुन आलेले तसेच स्थानिक अशी दोन्ही प्रकारची मुले या विधिसंघर्षग्रस्तांच्या दलदलीत अडकलेली आहेत. महाराष्ट्रात मुंबई विधिसंघर्षग्रस्त मुलांचे प्रमाणा आघाडीवर आहे, मुंबईत दरवर्षी ८०० विधिसंघर्षग्रस्त मुलांची प्रकरणे नोंदवली जातात. ठाण्यात ५०० तर पुण्यात ३५९ अशी आकडेवारी आहे. हि आकडेवारी वगळली तर उर्वरित महाराष्ट्रात विधिसंघर्षग्रस्त मुलांची आकडेवारी नगण्य आहे.

२००० मध्ये राज्यात अशा प्रकारातील १६४१ गुन्हे दाखल झाले होते. २०१० मध्ये ४२१५ तर २०११ मध्ये ४७७५ गुन्हांची नोंद झाली आहे. दहा वर्षात अशा गुन्ह्यांच्या संख्येत तीन पटीने वाढ झाली असुन ही धोक्याची घंटा मानली आहे. राज्यात सर्वाधिक गुन्हे मुंबईत घडले असुन त्यापाठोपाठ पुणे, ठाणे व नाशिकचा क्रांक लागतो.

संशोधन विषयाची निवड

सद्यस्थितीत पहाता महाराष्ट्रात ब-याच जिल्ह्यात विधिसंघर्षग्रस्त मुलांची संख्या दिसुन येते. आपण जागतिक, देशपातळीवर व राज्याच्या पातळीवर पाहिले असता विधिसंघर्षग्रस्त मुलां मुलींची दिवसेंदिवस वाढ होत आहे. म्हणून मला असा प्रश्न पडला की ही मुले खेळण्या, शिकण्याच्या

वयात या मार्गाकडे का वळले असतील. आपण याचा शोध घेतला पाहिजे म्हणून मी नांदेड जिल्ह्यातील विधिसंघर्षग्रस्त मुलांचा मानवी हक्कांचा अभ्यास हा विषय अभ्यासाला निवडला.

नांदेड मध्ये शिक्षणासाठी आलेल्या आजुबाजुच्या जिल्ह्यातील, तालुक्यातील, खेड्यातील मुले शिक्षणासाठी नांदेडमध्ये येतात. वेगवेगळ्या कुटुंबातील, वेगवेगळ्या समाजातील शैक्षणिक, सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक वारसा असणारे मुले येतात पालकांची कडक शिस्त आणि फाजील लाड मुले दुर रहातात म्हणून जास्तीचे पैसे पाठवणे यामुळे मुल गैर मार्गाला जाऊ शकतात. आई-वडिलांना मुलांसाठी वेळ नसतो मग ती मुले एकटं पडतात, यातुन देखील गुन्हे घडु शकतात.

नांदेडमध्ये बालसुधारगृह एक आहे. नांदेड मध्ये शाळा, कॉलेज यांची संख्या मोठ्या प्रमाणात आहेत आणि शिक्षणासाठी बाहेर गावाहून राहण्यासाठी येणा-या मुलांची संख्या देखील मोठ्या प्रमाणात आहे ती मुलं वेगवेगळ्या भागातून, वेगवेगळ्या संस्कृतीतून, परिस्थितीतून आलेली असतात त्यामुळे त्यांच्या हातून कळत न कळत कांही गुन्हे घडतात जसे की, छेड काढणे, चोरी करणे, मारामारी करणे, व्यसन करणे इ. प्रकारचे गुन्हे नांदेड येथे पहायला मिळतात. या व्यवहारामागचे काय कारण आहे हे जाणून घेणे महत्त्वाचे आहे म्हणून मी नांदेड जिल्ह्यातील विधिसंघर्षग्रस्त मुलांचा मानवी हक्कांचा अभ्यास हा विषय घेतला आहे.

जिल्ह्याच्या ठिकाणी विशेष न्यायालय असते त्याला बाल न्यायमंडळ म्हणतात त्यांना पालकांच्या देखरेखीखाली किंवा सुधारगृहात पाठवले जाते. विधिसंघर्षग्रस्त मुलांच्या समस्येला रोखण्यासाठी शासनाने उपाय योजना किंवा प्रतिबंधक कायदे केले आहेत.

१. उमेदवारी किंवा शिक्षार्थी कायदा १८५०
२. १८८४ चा बाल गुन्हेगारी कायदा
३. १८९७ चा सुधारगृह कायदा १९९७
४. १८२० चा बाल धुम्रपान बंदी कायदा
५. १९३३ चा बालरोजगार कायदा
६. मुंबईचा बाल कायदा १९४८
७. १९६० चा केंद्रिय कायदा
८. बोर्टल स्कुल ॲक्ट
९. परीविक्षा कायदा

संशोधनाचे महत्त्व :

सध्याच्या परिस्थितीत मुलांमध्ये वाढत असलेली हिंसा, उध्दटपणा आणि गुन्हेगारी प्रवृत्ती रोखण्यात सर्वात महत्त्वाचे काम पालकांचे आहे. आपल्या पातळीवर प्रयत्न करुनही मुला-मुलींच्या वागण्यात बदल होत नाही असे वाटल्यास समुपदेशन हाच त्यावर सर्वात चांगला मार्ग आहे. पालक

मुलांशी संवाद करत नाहीत हे जाणून घेणे मुलं आधुनिक तंत्रज्ञानाचा गैरवापर करत आहेत, या मागची कारणे जाणून घेणे, पालकांचे मुलांकडे होत असलेले दुर्लक्ष.

विधिसंघर्षग्रस्त मुलं हे आजारी समाजाचे लक्षण आहे. शहरातील वाढती गर्दी, बकालवस्त्या, जुगार, तस्करी, मद्यपानाने विधिसंघर्षगस्त मुलांची संख्या वाढत आहे हे जाणुन घेण्यासाठी तसेच औद्योगिकरण, नागरीकरणानामुळे विधिसंघर्षग्रस्त मुलांची संख्या वाढत आहे हे का वाढत आहे याचा शोध घेणे किंवा अभ्यास करणे हे अत्यंत महत्त्वाचे आहे. या व्यवहारामागील बालकांची असणारी मानसिकता, सामाजीक कारणे, सांस्कृतिक कारणे काय आहेत हे या विषयाच्या माध्यमातुन आपल्याला समजुन घ्यायचे आहे.

नांदेड शहरात या पध्दतीचे गुन्हे बालक करतात, त्यामागे त्याची कोणती मानसिकता आहे हे जाणुन घेणे. नांदेड शहरात शिक्षणासाठी खुप मोठ्या प्रमाणात शहरात मुले-मुली येतात, त्याच्या हातून कळत नकळत गुन्हे घडतात त्यामागील कारणांचा अभ्यास होणे महत्त्वाचे आहे.

बालकांच्या गुन्हे करण्यामागे अनुवंशीक, अंतस्त्राव ग्रंथी, शारिरीक दुर्बलता, शारिरीक विकृती, शारिरीक असामान्यता, सातत्याचे आजार, मानसिक दुर्बलता मानसिक रोग / मनोविकृती, व्यक्तीत्त्वाची लक्षणे, भावनात्मक अस्थिरता, कुटूंबाचा आकार, भग्न कुटुंब, अनैतिक कुटुंब, तिरस्कृत बालक, बहिण भाऊ संबंध, कुटूंबातील व्यसनाधिनता, अतिशिस्त व शिस्तिचा अभाव, कुटुंबाची आर्थिक स्थिती, दारिद्र्य, बेकारी, पौंगडावस्थेतील भावनोत्कटता यातून कसे बालगुन्हे घडतात याचा अभ्यास होणे महत्त्वाचे आहे.

संशोधनाचे उद्दिष्ट्ये :-

१. नांदेड जिल्ह्यातील विधिसंघर्षग्रस्त मुलांचा चिकित्सक अभ्यास करणे.
२. नांदेड जिल्हयातील विधीसंघर्ष मुलांथा आर्थिक, शैक्षणिक व सामाजिक स्थिती जाणून घेणे.
३. नांदेड जिल्हयातील मुलांच्या मानवी हक्काचा आणि योजनांचा अभ्यास करणे.

४. नांदेड जिल्हयातील विधी संघर्षग्रस्त मुलांचा सामाजिक आणि प्रशासकीय पातळीवर मानखंडनात्मक व्यवहाराचा अभ्यास करणे.

५. नांदेड जिल्हयातील विधीसंघर्षग्रस्त मूलांचे स्वरुप कारणांचा शोध येणे.

संशोधनाचे गृहीतकृत्येः

१. विधीसंघर्षग्रस्त मुलांच्या सामाजिक, आर्थिक, कौटुंबिक मागासलेपणा व अस्थिरता दिसून येते.
२. विधीसंघर्षग्रस्त मुलांच्या प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी शासकीय व निमशासकीय स्तरावर अपुरे प्रयत्न दिसून येतात.
३. विधीसंघर्षग्रस्त मुलांच्या गुन्ह्याच्या स्वरुपात नविन बदल दिसून येतात.

संशोधन पध्दती :-

प्रस्तुत संशोधन विषय हा नांदेड जिल्ह्यातील विधीसंघर्षग्रस्तांच्या संबंधीत आहे. नांदेड जिल्ह्यातील सुधारगृह आणि शासकिय संस्थांच्या आकडेवारीचा आधार घेऊन एकूण ३० मुलांचा (मुले मुली) व्यष्टिअध्ययन पध्दतीचा अवलंब करुन अभ्यास करण्यात येणार आहे, प्रस्तुत संशोधन विषयासाठी निदानात्मक संशोधन आराखड्याचा अवलंब करण्यात येणार आहे. विधिसंषर्धग्रस्त एक सामाजीक समस्या असून यास मानवी हक्काच्या उददेशाने प्रस्तुत शोध घेण्यात येणार आहे. ही समस्या सोडवण्यासाठी प्रस्तुत संशोधनात शोध घेण्यात येणार आहे.

प्रस्तुत संशोधन करण्यासाठी प्राथमिक आणि दुय्यम तव्य संकलन तंत्रांचा अवलंब करण्यात येणार आहे. निरिक्षण, सखोल मुलाखत, अनुसूची या प्राथमिक तंत्रांचा तथ्य गोळा करण्यासाठी वापर करण्यात येणार आहे. शासकिय व खाजगी कागदपत्रे, ग्रंथ, मासिके, अहवाल, शोधप्रबंध, शोध निबंध उपयोगात आणले जाणार आहेत.

कालावधी :

प्रस्तुत संशोधन करत असताना २०१७ ते २०२२ या कालावधीतील विधिसंघर्षग्रस्त मुलांचा अभ्यास करण्यासाठी हा कालखंड निवडला आहे.

संशोधन विषयाची व्याप्ती व मर्यादा :

व्याप्ती :

प्रस्तूत संशोधनामध्ये विषयाची व्याप्ती बालगुन्हेगाराचे पूर्व जीवनाचा शोध घेताला जाईल, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक याद्वारे विधिसंघर्षग्रस्तांच्या पुर्व जीवनाचा शोध घेतला जाईल.

मर्यादाः

सदर संशोधन हे नांदेड जिल्ह्याच्या संदर्भात असल्यामुळे या संशोधनाचे सामान्यीकरण करण्याची मर्यादा दिसून येते.

संशोधन विषयाची प्रकरणनिहाय मांडणी:

प्रकरण एक: प्रस्तावना

सदर प्रकरणामध्ये संशोधन विषयाची प्रस्तावना करण्यात येणार आहे.

प्रकरण दोन: संशोधन साहित्याचा आढावा

प्रकरण दोन मध्ये संशोधन साहित्याचा आढावा घेण्यार येणार आहे. विधीसंघर्षग्रस्त मुलांच्या संदर्भात जागतिक, भारतातील आणि महाराष्ट्रातील संशोधन साहित्याचा आढावा घेण्यात येणार आहे.

प्रकरण तीन: संशोधन पध्दती

प्रकरण तीनमध्ये सदर संशोधनासाठी आवश्यक असणारी संशोधन पद्धती मांडण्यात येणार आहे. संशोधन पद्धतीमध्ये व्यष्टी अध्ययनाचा आढावा घेण्यात येणार आहे.

प्रकरण चार:

नांदेड जिल्ह्यातील विधिसंघर्षग्रस्त मुलांच्या मानवी हक्कांचा अभ्यास

प्रकरण पाच:

प्रकरण पाच : विधिसंघर्षग्रस्त मुलं शासकिय उपाययोजना,

प्रकरण पाचमध्ये विधीसंघर्षग्रस्त मुलांच्या संदर्भातील शासकीय आणि निमशासकीय पातळीवरील उपयोजानांचा संदर्भात अभ्यास केला जाणार आहे.

प्रकरण सहा: निष्कर्ष व शिफारशी

सदर प्रकरणामध्ये प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे निष्कर्ष काढले जातील व त्यासंदर्भात शिफारशी केल्या जातील.

संदर्भसूची :-

१. Attar A.D. १९६४, Juvenile Delinquency, Bombay.

२. Parts, New York, १९७२-७३ ५ National Institute of Social Defense, Ministry of Social Welfare, Government of India, Towards Delinquency control. New Delhi.

३. Reckless walfer, १९६१, The Crime problem, Newyork.

४. https://thinkworkall.blogspot.com/२०२२/०४ Meaning-of- Juvenile- delinquency.html

५. लिला अवालवारिस, मुले व गुन्हेगारी, श्रीविद्या प्रकाशन,

६. डॉ. काळदाते सुधा भारतीय सामाजिक समस्या

७. प्रदिप आगलावे (संपा) २०२०, सामाजिक संशोधन पध्दतीशास्त्र व तंत्रे, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर.

८. Thakur Devendra, १९९७, Research, Methodology in Social Sciences, Deeep and Deep publications, New Delhi.

९. Goode and Hatt १९७२] Methods of social research, Mac, Graw- Hillbook company Inc, New York.

१०. Kumar, Devendra १९९७, Research Methodology in Social sciences. Deep and Deep Publications, New Delhi.

११. Moser, C.A. Survey Methods in Social Investigation.

संशोधक

गौतम केरबा कदम

मार्गदर्शक

डॉ. सुरेखा वि. दाडगे

कै. बापूसाहेब पाटील एकंबेकर महाविद्यालय, उदगीर जि. लातूर